**प्रेस नोट दि.०९/०३/२०१९**

**शिवाजीनगर पोलीस स्टेशन पुणे**

दि. ०९/०३/२०१९ रोजी पहाटे ०३.०० वा.चे सुमारास रात्रगस्तीकरीता असलेले पोलीस निरीक्षक श्री.गिरी बातमी मिळाली की शिवाजीनगगर एस.टी.स्टॅडमध्ये फिरत आहेत अशी माहिती मिळाल्याने पोलीस उप निरीक्षक गिरी यांनी पीटर मोबाईलवरील सपाफौ पांडे,पोशि पालके , मपोशि त्रिभुवन व सारसर यांचेसह शिवाजीनगर एस.टी.स्टॅड परिसरीमध्ये दोन अल्पवयीन मुलींचा शोध घेत असताना शिवाजीनगर एस.टी.स्टॅड इन गेट जवळ दोन अल्पवयीन मुली उभ्या असल्याचे दिसुन आल्याने त्यांना मपोशि त्रिभुवन व सारसर यांचे मदतीने ताब्यात घेतले व त्यांना विश्वासात घेवुन त्यांचेकडे चौकशी करीत असताना सदर मुलींनी आमचे आईवडील  एस.टी.स्टॅडमध्ये आहेत आम्ही खाण्यासाठी बाहेर आलो आहोत असे सांगीतल्याने त्यांचेसह एस.टी.स्टॅडमध्ये त्यांचे आईवडीलांचा शोध घेतला असता ते मिळुन आले नाहीत त्यामुळे सदर मुलींना शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे घेवुन येवुन त्यांना त्यांचे नाव व पत्ते विचारले असता त्या मुलींनी त्यांचे नाव पत्ता १.एक अल्पवयीन मुलगी, वय-१३ वर्षे रा.अहमदनगर २.एक अल्पवयीन मुलगी, वय-१२ वर्षे,रा.सदर असे सांगीतले त्याबाबत पोउनि गिरी यांनी अहमदनगर नियंत्रण कक्ष येथे संपर्क साधुन भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन अहमदनगर येथे फोनद्वारे संपर्क केला त्यावेळी तेथील सपोफौ मुळे यांनी वरील दोन्ही मुलींना कोणीतरी पळवुन नेलेबाबत गु.रजि.नं.२३७/२०१९ भादवि कलम ३६३ प्रमाणे अज्ञात व्यक्ती विरुध्द आज दि.०९/०३/२०१९ रोजी पहाटे ०१.१७ वा.गुन्हा दाखल झाला असल्याचे माहिती मिळाली त्यांना सदरच्या दोन्ही मुली या सुखरुप शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे असल्याचे सांगुन त्यांचे नातेवाईकांचे फोन नं.घेतले त्या प्रमाणे मुलगी शिवानी हिचे वडीलांचा फोन यावर संपर्क करुन मुलगी सुखरुप असल्याचे कळविले.त्या दोन्ही मुलींना त्यांचे ओळखीची मुलगी हिचे वडिल नामे शांतीभाई दलजीभाई मकवाना रा.डीएसपी चौक एससी डेपो जेम्स रोड एमईएस पंप हाउस जवळ अहमदनगर यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

वरील नमुद कारवाई ही श्री.बाळासाहेब कोपनर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि विजयकुमार शिंदे,पोउनि गिरी,सपोफौ पांडे, पोशि पालके , मपोशि त्रिभुवन व सारसर यांनी केलेली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**शिवाजीनगर पोलीस स्टेशन पुणे**